पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ
सोलापूर विद्यापीठ
॥ विद्यया संपन्नता ॥
NAAC Accredited 2022
'B++' Grade (CGPA 2.96)

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

**PUNYASHLOK AHILYADEVI HOLKAR SOLAPUR UNIVERSITY, SOLAPUR**

केगांव, सोलापूर-४१३ २५५, महाराष्ट्र (भारत)

✆ ०२१७-२७४४७७८/ ११३/११४ (११ लाईन्स), फॅक्स: ०२१७-२३५११३००

संकेतस्थळ : http:sus.ac.in ✉ registrar@sus.ac.in

bos@sus.ac.in

## अभ्यासमंडळे विभाग

## परिपत्रक

**विषय: कॅरीऑन बाबत.**

संदर्भ: १. दि.२८/०७/२०२५ रोजी झालेल्या विद्यापरिषदेच्या बैठकीतील ठराव क्र.५१.
२. दि.२८/०७/२०२५ रोजी झालेल्या विद्यापरिषदेच्या बैठकीतील ठराव क्र.५८(६).
३. कॅरी ऑन गठीत समितीची दि.३१/०७/२०२५ व दि.०४/०८/२०२५ रोजीची बैठक

विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता चारही विद्याशाखा अंतर्गत येणाऱ्या अभ्यासक्रमामध्ये अनुत्तीर्ण झालेल्या आणि निकाल प्रलंबित असलेल्या सर्व विद्यार्थ्यांना तसेच एल. एल. एल. बी. आणि बी. ए. एल. एल. बी. अभ्यासक्रमास शैक्षणिक वर्ष २०२५-२६ या वर्षाकरिता फूल कॅरीऑन देण्याच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे मान्यता देण्यात येत आहे.

अ. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करीता एल.एल.बी. आणि बी.ए. एल.एल.बी या अभ्यासक्रमाकरिता Carry On खालील नियमांच्या अधिन राहून लागू करण्यात येत आहे.

१. शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ करीता जे विद्यार्थी एल.एल.बी. आणि बी.ए. एल.एल.बी च्या या अभ्यासक्रमाकरिता प्रवेशित आहेत, अशाच विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ करीता Carry On चा लाभ देण्यात येईल.
२. शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ करीता जे विद्यार्थी एल.एल.बी. आणि बी.ए. एल.एल.बी च्या या अभ्यासक्रमाकरिता प्रवेशित होते. परंतु संबंधित अभ्यासक्रमाच्या परीक्षेतील विषयांमध्ये अनुत्तीर्ण झाल्यामुळे ते शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ मध्ये पुढील वर्गात प्रवेश घेण्यास पात्र नव्हते, अशा विद्यार्थ्यांना Carry On चा लाभ देऊन पुढील वर्गातील प्रवेशाकरिता पात्र समजण्यात यावे.
३. शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ मध्ये Carry On चा लाभ केवळ त्याच विद्यार्थ्यांना देय राहील, ज्यांना त्यांचे प्रवेशित अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांनी विहित केलेल्या तरतूदींनुसार अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी विहित केलेला कालावधी व संधी उपलब्ध आहे.
४. सदर नियमावली विद्यापीठ संकुले तसेच सर्व संलग्नित महाविद्यालये व मान्यता प्राप्त संस्था / महाविद्यालयांना कळविण्यात यावी.
५. Carry On ची विशेष संधी शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ मध्ये उपलब्ध करून देण्यात यावी.
६. Carry On अंतर्गत देण्यात आलेल्या संधी संबंधी आवश्यक त्या बाबींची पूर्तता संबंधीत संकुल / महाविद्यालयाने यांनी करावी.
७. पुढे अशीही शिफारस करण्यात येते की, उपरोक्त प्रस्तावित नियमावली व्यतिरिक्त प्रवेश व परीक्षेसंबंधीचे विद्यापीठाने विहित केलेले Statute, Ordinance व इतर सर्व नियम लागू राहतील. त्याचप्रमाणे पदवीसंबंधी शिखर संस्थेने वेळोवेळी अमलात आणलेले नियमही लागू राहतील.
८. सदर Carry On संधी उपलब्ध करुन देण्यात आल्यामुळे प्रवेशित विद्यार्थ्यांना अनुज्ञेय असलेल्या विविध लाभाबाबत केंद्र सरकार, महाराष्ट्र शासन, शासकीय व निमशासकीय कार्यालय व तसेच पदवीसंबंधी शिखर संस्थेने वेळोवेळी अमलात आणलेले नियमही लागू राहतील. याबाबत संबंधितांना कळविण्यात यावे.

**ब.** शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ मध्ये अनुत्तीर्ण झालेल्या आणि निकाल प्रलंबित असलेल्या सर्व विद्याशखेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ वर्षाकरिता एल.एल.बी. आणि बी.ए. एल.एल.बी अभ्यासक्रम वगळता सर्व विद्याशाखा अंतर्गत विविध अभ्यासक्रमाकरिता प्रवेश घेण्यासाठी खालील नियमांच्या अधिन राहून Carry On लागू करण्याची शिफारस समिती करीत आहे.

१. शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ मध्ये अनुत्तीर्ण झालेल्या आणि निकाल प्रलंबित असलेल्या सर्व विद्याशाखा अतंर्गत विविध अभ्यासक्रमाकरिता प्रवेशित सर्व पात्र विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ मध्ये अनुत्तीर्ण झालेल्या आणि निकाल प्रलंबित असल्यामुळे त्यांना शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ वर्षाकरिता प्रवेश घेण्यास पात्र ठरत नव्हते, अशा सर्व प्रवेशित विद्यार्थ्यांना Carry On चा लाभ देण्याची शिफारस समिती करीत आहे.

२. शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ मध्ये अनुत्तीर्ण झालेल्या आणि निकाल प्रलंबित असलेले सर्व विद्याशाखा अतंर्गत विविध अभ्यासक्रमाकरिता प्रवेशित विद्यार्थी जे शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ मध्ये अनुत्तीर्ण झालेल्या आणि निकाल प्रलंबित असल्यामुळे शैक्षणिक वर्ष २०२५-२६ वर्षाकरिता प्रवेश घेण्यास पात्र ठरत नव्हते, अशा विद्यार्थ्यांना Carry On चा लाभ देऊन पुढील वर्गातील प्रवेशाकरिता पात्र समजण्यात यावे.

३. शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ मध्ये Carry On चा लाभ केवळ त्याच विद्यार्थ्यांना देय राहील, ज्यांना त्यांचे प्रवेशित अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली, इतर संबंधित शिखर संस्था व शासनाने यासंबंधी वेळोवेळी विहित केलेल्या तरतूदींनुसार अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी विहित केलेला कालावधी व संधी उपलब्ध आहे.

४. सदर नियमावली विद्यापीठ संकुले तसेच सर्व संलग्नित महाविद्यालये व मान्यता प्राप्त संस्था / महाविद्यालयांना कळविण्यात यावी.

५. Carry On ची विशेष संधी शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ मध्ये उपलब्ध करून देण्यात यावी.

६. Carry On अंतर्गत देण्यात आलेल्या संधी संबंधी आवश्यक त्या बाबींची पूर्तता संबंधीत संकुल / महाविद्यालयाने यांनी करावी.

७. पुढे अशीही शिफारस करण्यात येते की, उपरोक्त प्रस्तावित नियमावली व्यतिरिक्त प्रवेश व परीक्षेसंबंधीचे विद्यापीठाने विहित केलेले Statute, Ordinance व इतर सर्व नियम लागू राहतील. त्याचप्रमाणे पदवीसंबंधी शिखर संस्थेने वेळोवेळी अमलात आणलेले नियमही लागू राहतील.

८. सदर Carry On संधी उपलब्ध करुन देण्यात आल्यामुळे प्रवेशित विद्यार्थ्यांना अनुज्ञेय असलेल्या विविध लाभाबाबत केंद्र सरकार, महाराष्ट्र शासन, शासकीय व निमशासकीय कार्यालय व तसेच पदवीसंबंधी शिखर संस्थेने वेळोवेळी अंमलात आणलेले नियमही लागू राहतील. याबाबत संबंधितांना कळविण्यात यावे.

(डॉ. अर्चना साळुंखे)
उपकुलसचिव

सोबत: हमीपत्राचा नमूना जोडलेले आहे. त्याप्रमाणे पुढील कार्यवाही करावी.

पुअहोसोविसो/अमंवि/२०२५/ 6287
दि. [illegible] AUG 2025

प्रत: माहितीस्तव तथा पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी:
१. **मा.कुलगुरु महोदयांचे कार्यालय,** पुअहोसोविसो.
२. **मा. प्र-कुलगुरु महोदयांचे कार्यालय,** पुअहोसोविसो
३. **मा. कुलसचिव महोदयांचे कार्यालय,** पुअहोसोविसो
४. **मा. संचालक,** परीक्षा व मूल्यमापन मंडळ विभाग, पुअहोसोविसो
५. **मा. प्राचार्य,** विद्यापीठ संलग्नित सर्व महाविद्यालये व शैक्षणिक संकुले, पुअहोसोविसो.
६. **Edulab,** पुअहोसोविसो.

**-: हमीपत्र :-**

विद्यार्थ्यांचे नाव :---------------------------------------------------------

महाविद्यालयाचे नाव :-------------------------------------------------------

वर्ग--------------------------------वर्ष :-------------------------------------

मी (पुर्ण नाव) ---------------------------------------------------------स्वेच्छेन लिहून देतो/देते की, मी पुढील वर्गात प्रवेश घेण्यासाठी पात्र नसतानाही विद्यापीठाने माझे मागील वर्गातील नापास विषयासह पुढीलवर्षी प्रवेश मिळण्याकरीता Carry On लागू केले आहे. प्रस्तुत Carry On व्द्ारे माझा ---------------------------वर्गातील प्रवेश हा शै. वर्ष-2025-2026 साठी असेल. माझा प्रवेश विद्यापीठ अनुदान आयोग, शिखर संस्था व विद्यापीठ नियमाच्या विसंगत झाले असेल तर माझा प्रवेश कोणत्याही टप्यावर रद्द करण्यात येऊ शकतो याची मला जाणीव आहे, व तसे झाल्यास माझी काही हरकत नसेल. तसेच शासनाकडून मिळणाच्या स्कॉलरशिप व अन्य लाभापासून मी वंचित राहिलो/राहिले तर माझी कोणतीही हरकत राहणार नाही. तसेच मी प्रवेशीत असलेले अभ्यासक्रम UGC ने विहित केलेल्या कालावधीत पूर्ण करणे माझ्यावर बंधनकारक आहे. या बाबत मला संपूर्ण कल्पना आहे.

हे हमीपत्र मी स्वेच्छेन लिहून देत आहे. दि.---------------

स्वाक्षरी :

विद्यार्थ्यांचे नाव :

मोबाईल नंबर :

वर्ग :

स्थळ :

दिनांक :